**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र. १५३** **दिनांक ११/०६/२०२१**

# बॅंकेतील चेक बनावटीकरून फसवणुक करणा-या आरोपीस अटक करण्यात विरार पोलीस ठाणे यांना यश

दिनांक १३/०१/२०२१ रोजी १६.३० वा. ते दि. १४/०१/२०२१ रोजी सकाळी १०.३० वा. चे सुमारास स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा मनवेलपाडा, विरार पूर्व ता वसई, जि. पालघर, येथे एक अनोळखी इसमाने फिर्यादीचे बॅंकेतील ग्राहक संतोषकुमार व्हेलाल हा मीच आहे असे फिर्यादी व साक्षिदार यांना भासवुन त्याबाबत तोतयेगिरी करुन बॅंकेचे ग्राहक विजयकुमार व्हेलाल यांच्या मौल्यवान चेक क्रमांक ७१६२७७ मध्ये बनावटीकरन करुन तो चेक खरा आहे असे भासवुन बॅंकेतील ग्राहक नामे विजयकुमार व्हेलाल यांचे सेव्हींग अकाऊन्ट नंबर ११२१३४७८६५५ मधुन बॅरर चेक नंबर ७१६२७७ या व्दारे ४५,०००/- रुपये रोख रक्कम काढुन फिर्यादीचे बॅंकेची व ग्राहकाची फसवणुक केलेली होती. सदर बाबत दिनांक ०४/०६/२०२१ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र ४८०/२०२१ भादंविस कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील गुन्हयाप्रमाणे वाढत्या फसवणुकीचे गुन्हयाबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दखल घेऊन, सदरचा गुन्हा ऊघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे आरोपीची गुन्हे करण्याची कार्यपध्दती, तांत्रिक बाबी आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन पियुष ग्यानेंद्र शर्मा, वय ३४ वर्षे, रा. डी/३०३, रश्मी स्टारसीटी, आचोळे पार्कच्या जवळ, नालासोपारा (पू.), यास विरार पोलीस स्टेशनचे तपासी पथकाने दिनांक ०५/०६/२०२१ रोजी अटक केली असून त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

तसेच आरोपीचे अटके दरम्यान करण्यात आलेल्या तांत्रीक तपासामध्ये नमुद गुन्ह्याव्यतिरीक्त त्याचा इतर खालील नमुद एकुण ०७ फसवणुकीचे गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

**१. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ४८०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१**
**२. अर्नाळा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १७७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४**
**३. अर्नाळा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १७९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४**
**४. नालासोपारा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २३९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०**
**५. नवघर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३९५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०**
**६. माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३०५/२०१९, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४**
**७. माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २१८/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१**

सदरची कामगीरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, श्रीमती रेणुका बागडे, सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोनि. विवेक सोनवणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, जगदिश मराठे, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार यांनी केली आहे.

------00000------